# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका अंतर्गत कर्मचाऱ्यांची (A) सातव्या वेतन
**{सामान्य प्रशासन विभाग}** आयोगानुसार करण्यात आलेली वेतन निश्चितीची अचूकता पडताळणीसाठी व DCPS अंतर्गत प्रकरणाची तपासणी करिता, (B) कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे तपासणी करुन अतिरिक्त प्रदानाचा शोध घेणे तसेच महालेखाकार व स्थानिक निधी लेखा परिक्षण पथकाने घेतलेल्या आक्षेपाचे निराकरण करणेकरिता (C) कर्मचाऱ्यांची देयक आणि इतर वित्त विषयक बाबी पडताळणी व विशिष्ट प्रकरणी तपासणी करुन अभिप्राय नोंदविणे करिता, अंदाजपत्रकीय मदत करण्याकरिता इत्यादी विवक्षित कामे करिता जाहिरात क्र. ८९/पी.आर. दि. ०६/०७/२०२१ च्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीव्दारे प्रत्यक्ष मुलाखती घेवून निवड करण्यात आलेल्या विवक्षित कामांच्या अनुषंगाने अनुक्रमे (B) श्री. श्रीधर रायभानजी बढीये, सेवानिवृत्त जिल्हा लेखा परिक्षा अधिकारी,(C) श्री. सुरेश शिवाज मते, सेवानिवृत्त लेखाधिकारी, यांना करार पध्दतीवर महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार, करार पध्दतीने प्रथमत: ६ महिन्याकरीता, शासन निर्णय दि. १७ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक तत्वावर, कार्यालयीन आदेश क्र. ५६-A/B/Cओ.ॲण्डएम दि. १०/०८/२०२१ अन्वये“लेखा सलागार” म्हणून नियुक्ती करण्यात आलेले आहे. त्यानंतर म.न.पा प्रशासक ठराव क्र. २५० दिनांक ०३/०२/२०२३ नुसार कार्यालयीन आदेश क्र. ५६/ ओ.ॲण्डएम, दिनांक १५/०२/२०२३ या आदेशान्वये त्यांचा नियुक्ती कालावधी दि. १३/०१/२०२४ रोजी संपुष्टात येणार असल्यामुळे दोन कंत्राटी लेखा सल्लागार श्री. श्रीधर बढीये व सुरेश मते त्यांच्या सेवेची वित्त विभागाला आवश्यकता असल्यामुळे, तांत्रिक खंड देऊन दि. १४/०१/२०२४ ला शासकीय सुट्टी असल्यामुळे दि. १६.०१.२०२४ पासून पुढील ६ महिन्याकरिता (दि. १५/०७/२०२४ पर्यंत) मुदतवाढ देण्याचा व याकरिता अंदाजे रु. ६,४१,२५०/- इतका खर्च येणार असून प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी.
टिप:- सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 673/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 01/01/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका अंतर्गत कर्मचाऱ्यांची (A) सातव्या वेतन आयोगानुसार करण्यात आलेली वेतन निश्चितीची अचूकता पडताळणीसाठी व DCPS अंतर्गत प्रकरणाची तपासणी करिता, (B) कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे तपासणी करुन अतिरिक्त प्रदानाचा शोध घेणे तसेच महालेखाकार व स्थानिक निधी लेखा परिक्षण पथकाने घेतलेल्या आक्षेपाचे निराकरण करणेकरिता (C) कर्मचाऱ्यांची देयक आणि इतर वित्त विषयक बाबी पडताळणी व विशिष्ट प्रकरणी तपासणी करुन अभिप्राय नोंदविणे करिता, अंदाजपत्रकीय मदत करण्याकरिता इत्यादी विवक्षित कामे करिता जाहिरात क्र. ८९/पी.आर. दि. ०६/०७/२०२१ च्या अनुषंगाने

गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीव्दारे प्रत्यक्ष मुलाखती घेवून निवड करण्यात आलेल्या विवक्षित कामांच्या अनुषंगाने अनुक्रमे (B) श्री. श्रीधर रायभानजी बढीये, सेवानिवृत्त जिल्हा लेखा परिक्षा अधिकारी,(C) श्री. सुरेश शिवाज मते, सेवानिवृत्त लेखाधिकारी, यांना करार पध्दतीवर महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार, करार पध्दतीने प्रथमत: ६ महिन्याकरीता, शासन निर्णय दि. १७ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक तत्वावर, कार्यालयीन आदेश क्र. ५६-A/B/Cओ.ॲण्डएम दि. १०/०८/२०२१ अन्वये"लेखा सलागार" म्हणून नियुक्ती करण्यात आलेले आहे. त्यानंतर म.न.पा प्रशासक ठराव क्र. २५० दिनांक ०३/०२/२०२३ नुसार कार्यालयीन आदेश क्र. ५६/ ओ.ॲण्डएम, दिनांक १५/०२/२०२३ या आदेशान्वये त्यांचा नियुक्ती कालावधी दि. १३/०१/२०२४ रोजी संपुष्टात येणार असल्यामुळे दोन कंत्राटी लेखा सल्लागार श्री. श्रीधर बढीये व सुरेश मते त्यांच्या सेवेची वित्त विभागाला आवश्यकता असल्यामुळे, तांत्रिक खंड देऊन दि. १४/०१/२०२४ ला शासकीय सुट्टी असल्यामुळे दि. १६.०१.२०२४ पासून पुढील ६ महिन्याकरिता (दि. १५/०७/२०२४ पर्यंत) मुदतवाढ देण्याचा व याकरिता अंदाजे रु. ६,४१,२५०/- इतका खर्च येणार असून प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**